# विक्रीकर

## १. सीआर/३४६/ठाणे/१४

फिर्यादी हे ठाणे शहरातील रहिवाशी असून ते बांधकाम व्यवसायिक आहेत. त्यांच्या कंपनीवर लावण्यात आलेला विक्रीकर रद्द करण्यासाठी आरोपी लोकसेवक क्र.१ रमेश भागोजी जैद, विक्रीकर उपायुक्त, वर्ग–१, विक्रीकर कार्यालय, कल्याण यांनी फिर्यादीकडे रु.५० लाखाच्या लाचेची मागणी केली. तडजोडीअंती रु. २० लाख देण्याचे मान्य झाले. त्यापैकी रु. ५ लाखाचा पहिला हप्ता आलोसे रमेश भागोजी जैद यांचेकडे काम करणारा आरोपी खाजगी इसम आर्चिस उदय विसरीया यांचे मार्फतीने स्वीकारताना पकडण्यात आले.

सदरबाबत मानपाडा पो.स्टे. ठाणे शहर गु.र.नं. २२/२०१४ लाप्रका कायदा कलम ७,१२,१३(१) (ड) सह १३(२) लाप्रका १९८८ अन्वये नोंद करण्यात येवून आरोपी लोकसेवक यांना आरोपी खाजगी इसमासह अटक करण्यात आली आहे.

## २. सीआर/२०७/मुंबई/२०१५

फिर्यादी प्रविणकुमार भिकालाल ठाकूर, वय ४९ वर्षे, धंदा – मिठाई व्यापार, राहणार – १४०२, संघवी एक्झॉटीका, मराठा कॉलनी रोड, दहिसर (पूर्व), मुंबई ६८ यांनी समक्ष येऊन त्यांच्या मिठाईच्या दुकानावर कारवाई करण्याची भिती दाखवून आरोपी लोकसेवक किरण केरुपंत काकड, वय ४५ वर्षे, सहाय्यक विक्रीकर आयुक्त, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई यांनी रू. १० लाख लाचेची मागणी करून तडजोडी अंती रू. ६ लाख लाचेची मागणी केली म्हणून दिनांक २६. ०२.२०१५ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो, मुंबई विभाग येथे लेखी तक्रार दिली.

फिर्यादीच्या तक्रारीची दिनांक २६.०२.२०१५ रोजी पडताळणी करण्यात आली त्यामध्ये आरोपी लोकसेवकांने फिर्यादीकडे रू. ६ लाख लाचेची मागणी करून रू. ४ लाख लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. सदर लाचेची रक्कम फिर्यादीचा मुलगा नामे लव यांचेमार्फत घेऊन येण्यास सांगीतले. त्यानुसार अॅन्टी करप्शन ब्युरो, मुंबई विभागामार्फत केलेल्या सापळा कारवाईत आरोपी लोकसेवक किरण केरुपंत काकड, वय ४५ वर्षे, सहाय्यक विक्रीकर आयुक्त, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई यांना रू.४,००,०००/– लाचेची रक्कम स्विकारल्यावर आरोपीचे राहते घराजवळ व्हाईट लिली को.ऑप. हौ.सोसा. भाबरेकर मार्ग, दादर पश्चिम, मुंबई–२८ या ठिकाणी रंगेहात अटक करण्यात आली. आरोपी लोकसेवक यांचेविरूध्द फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरून दिनांक २७.०२.

२०१५ रोजी ॲन्टी करप्शान ब्युरो, बृहन्मुंबई विभाग, मुंबई येथे गुन्हा नोंद क्रमांक १४/२०१५, कलम ७, १३(१)(ड) सह १३(२) भ्र.प्र.अधिनियम, १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी लोकसेवकाच्या घरातून लाचेची रक्कम रू.४ लाख हस्तगत करण्यात आली. आरोपीच्या दोन्ही हातास व लाचेच्या रकमेस ॲन्थ्रासीन पावडरची चकाकी आढळून आली.

आरोपी लोकसेवक किरण केरुपंत काकड, वय ४५ व र्ो, सहाय्यक विक्रीकर आयुक्त, विक्रीकर भवन, माझगांव, मुंबई यांना नमूद गुन्हयात दिनांक २७.०२.२०१५ रोजी ११.४० वा अटक करण्यात आली. त्यास मा. न्यायालयाने दिनांक ०२.०३.२०१५ रोजी जामीन मंजुर केला

यातील आरोपी लोकसेवक काकड यांच्या घराची झडती घेण्यात आली असून घरझडतीत रोख रक्कम रु.१४,८५,०००/— मिळुन आली. सदरची रक्कम घरझडती पंचनाम्यात ताब्यात घेण्यात आलेली आहे.

## ३. सीआर/१४८/पुणे/२०१५

तक्रारदार यांनी फर्म चालु केली होती व त्यात त्यांना नुकसान झााल्याने ती बंद केली व रितसर सेल्स टॅक्स रजिस्ट्रेशन कॅन्सल केले व व्हॅट रिफंडसाठी त्यांनी विक्रीकर भवन, येरवडा येथे अर्ज केला होता. आरोपी लोकसेवक श्रीमती नयना राजन गुहागरकर, वय—४९ व र्ो, विक्रीकर अधिकारी, व्हॅट परतावा विभाग, विक्रीकर भवन, पुणे यांनी त्यांना सुरवातीला रु.२,५००/— व नंतर रु.१०००/— रकमेची लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम हि रिफंडचा चेक देते वेळी द्यावी लागेल असे सांगितले होते .

तक्रारदार यांची आरोपी लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने ॲन्टी करप्शन ब्युरो,पुणे येथे तक्रार नोंदविली. त्यानुसार विक्रीकर भवन येथील कार्यालयात सापळा कारवाईचे आयोजन केले असता लोकसेवक यांनी त्याच्या लोकसेवक पदाच्या नात्याने आवश्यक असलेले काम पार पाडण्यासंबधात कायदेशीर परिश्रमाखेरीज , भ्रष्ट मार्गाने, आपल्या पदाचा गैरवापर करुन स्वतसाठी तक्रारदार यांचेकडे लाच रक्कम रु.१,०००/— मागणी करुन स्वीकारली असता पंचासमक्ष रंगेहात पकडण्यात आले आहे सदर नुसार येरवडा पो.स्टे., पुणे शहर, भाग—६, गु.र.नं.३०२१/२०१५, ला.प्र.का.क ७, १३(१)(ड) सह १३(२) अन्वये अटक करण्यात आलेली आहे.